# बृहन्मुंबई महानगरपालिका
## लोकमान्य टिळक महानगरपालिक सर्वसाधारण रुग्णालय, शिव – 22

दिनांक: 16.05.2023

## जाहिरात

लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकिय महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील खालील नमुद संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित नमुन्यातील अर्ज www.portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. सदर पदासाठी रुपये 291/- + 18% जीएसटी रु. 52/- = एकूण रु. 344/- इतके शुल्क लो.टि.म.स. रुग्णालयाच्या रोखपाल विभागात दि. 17/05/2023 ते 22/05/2023 पर्यत कार्यालयीन वेळेत (2 रा व 4 था शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 11:00 ते दुपारी 1.30 वाजेपर्यत भरून, त्याची पावती अर्जासोबत जोडून अर्ज लो.टि.म.स.रुग्णालयाच्या आवक/जावक विभागात सादर करावा.

खालील नमुद केलेल्या अर्हता व अटींची पुर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

| अनु. क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 1 | भौतिकोपचार तज्ञ | 08 | रु. 25000/- | • उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा B.Sc. (PT) (बी. एस. सी. (भौतिकोपचारतज्ञ)) / B.P.Th. (बॅचलर ऑफ़ फ़ीजीओथेरेपी) पदवीधारक असावा<br>• उमेदवार महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतीकोपचार परिषद, मुंबई येथे नोंदणीकृत असावा. |
| 2 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 10 | रु.20000/- | • उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील (Degree in B. Sc.) पदवी धारण करणारा असावा आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची (Maharashtra State Board of Technical Education) ची डी.एम.एल.टी. पदविका (Diploma in Medical Laboratory Technology) पदविका उत्तीर्ण झालेला असावा. (B.Sc. + DMLT)<br>**किंवा**<br>• उमेदवाराने 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांचेकडील निम वैद्यकिय तंत्रज्ञान या शाखेतील लॅबोरेटरी मेडिसीन या विषयातील (Bachelor of Paramedical Technology in Laboratory Medicine) पदवी धारण करणारा असावा.<br>• उमेदवारास खात्यांतर्फे घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade Test) परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. |
| 3 | औषधनिर्माता | 10 | रु. 18000/- | • उमेदवाराकडे राज्य शासनाच्या जनशिक्षण पडताळणी फार्मसीमधील पदविका किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची फार्मसी मधील पदवी असणे आवश्यक आहे. |

<table>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td>• उमेदवार महाराष्ट्र राज्य फार्मसी कैन्सिलकडे नोंदणीकृत असावा.</td></tr>
<tr><td colspan="5">a. उमेदवार माध्यामिक शालान्त प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>b. उमेदवार ‘डीओईएससीसी’ सोसायटीचे ‘सीसीसी’ किंवा ‘ओ स्तर’ किंवा ‘ए स्तर’ किंबा ‘बी स्तर’ किंवा ‘सी स्तर’ स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे ‘एम. एस. सी. आय. टी.’ किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा.</td></tr>
</table>

<u>सर्वसाधारण अटी व शर्ती :</u>

1. कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणारे ठोक मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.
2. त्यांच्या कंत्राटी सेवेच्या कालावधीमध्ये दर 45 दिवसापूर्वी एक दिवसाचा तांत्रिक खंड देण्यात येईल.
3. उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार साप्ताहिक रजा व एका कॅलेंडर वर्षाला 15 नैमित्तिक रजा अनुज्ञेय असेल, त्या व्यतिरिक्त इतर कोणतीही रजा अनुज्ञेय नाही.
4. कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता सेवा समाप्त केली जाईल.
5. त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.
6. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमावली नुसार ही नेमणुक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत.
7. नियुक्तीचे वेळी उमेदवाराकडुन रु.200/-बाँड पेपर वर करारनामा करुन घेण्यात येईल.
8. ते दररोज नियमाने हजेरी पटावर त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार स्वाक्षरी करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल. त्यांची विना परवानगी गैरहजेरी विना वेतनी गैरहजेरी करण्यात येईल.

**वयोमर्यादा**: उमेदवाराचे वय 18 वर्षापेक्षा कमी व 38 वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.

विशेषसुचना :

अ) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ब) अर्जाचे विहित मुल्य भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

सही/- 16.05.2023
अधिष्ठाता
लो.टि.म.स. रुग्णालय